पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव-३३
गक्षेका/४/कावि / ९२ /२०१९
दिनांक : २/०१/२०१९

प्रति,

मा. ---- ---------------- -

सदस्य/ सदस्या, ग प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
थेरगाव, पुणे-४११०३३

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग प्रभाग समितीची मासिक सभा
**सोमवार दि. ७/१/२०१९** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.ग प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार **दिनांक ७/१/२०१९ रोजी सकाळी ११.००** वाजता ग क्षेत्रीय कार्यालयातील “ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह ” येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

.

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
गप्रभागसमिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग प्रभाग समिती
**कार्यपत्रिका क्रमांक १०**

**दिनांक : ७/०१/२०१९** वेळ: **सकाळी ११.०० वाजता**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ग प्रभाग समितीची मासिक सभा **सोमवार दिनांक ७/१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता** ग क्षेत्रीय कार्यालयातील " ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह" येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

दि. ५/१२/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ९) कायम करणे.

विषय क्रमांक **१**) मा.निकीता कदम यांचे दिनांक १९/१२/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मिलिंदनगर पिंपरी या ठिकाणी संतोषी माता मंदीरामागे सार्वजनिक वाचनालय बांधणेत यावे, तरी सदर जागा हि पालिकेच्या मालकिची असुन त्या ठिकाणी वाचनालय व समोरील बाजुस सिमेंट काँक्रिटीकरण करुन देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) मा.क्षेत्रिय अधिकारी ग क्षेत्रिय कार्यालय यांचे पत्र क्र.गक्षेका/प्रशा/६/कावि/ ०४ /२०१८ दि. ०२/०१/२०१८ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका "ग" क्षेत्रिय कार्यालय दिनांक ०९/०८/२०१७ पासुन नव्याने कार्यान्वित झालेले असुन नविन प्रभाग रचनेनुसार "ड" क्षेत्रिय कार्यालयाकडुन प्रभाग क्र २१ व २७ तसेच "ब" क्षेत्रिय कार्यालयाकडुन प्रभाग क्र २३ व २४ असे प्रभाग मिळुन "ग" क्षेत्रिय कार्यालयाची निर्मिती झाली असुन या क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र २१,२३,२४,२७ या प्रभागांचा समावेश करण्यात आलेला आहे.

उपरोक्त विषयान्वये मा.आयुक्त साहेब यांचे दालनात दि २९/१२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, मा.आयुक्त साहेब यांचे सुचने नुसार मनपा कार्यक्षेत्रातील शहर फेरीवाला धोरणातंर्गत हॉकर्स झोन निश्चिती तसेच नो हॉकर्स निश्चित करून सदर रस्त्याची नावे ,ठिकाणे घोषित करणेबाबत सुचविणेत आलेले आहेत.

| अ.क्र | **निश्चित हॉकर्स झोन ठिकाणे** |
|---|---|
| ०१ | पॉवर हाऊस चौक ,नवमहाराष्ट्र शाळे समोर पिंपरी (वार्ड क्र २१) |
| ०२ | तपोवन मंदिर रस्त्याजवळील भाजी मंडई(वार्ड क्र २१) |
| ०३ | आझाद मित्र मंडळ चौक (वार्ड क्र २७) |
| ०४ | कुणाल हॉटेल ते नखाते (साईप्रितम नगरी) (वार्ड क्र २७) |
| ०५ | रहाटणी फाटा(वार्ड क्र २७) |
| ०६ | श्रीनाथ हौ(डावी बाजु) जवळिल रस्ता.सोसा. (वार्ड क्र २३) |
| ०७ | श्रीनाथ हौ(उजवी बाजु) जवळिल रस्ता.सोसा. (वार्ड क्र २३) |
| ०८ | हनुमान जिम शेजारी थेरगाव गावठाण रस्ता(वार्ड क्र २४) |
| ०९ | शिवकॉलनी कमान शेजारी वाकड रस्ता(वार्ड क्र २४) |
| १० | मनपा मैदाना जवळ थेरगाव गावठाण रस्ता २२न .(वार्ड क्र २४) |

| | |
|---|---|
| ११ | खिंवसरा मनपा शाळा ते वाकड रस्ता. ( रद्द - कोर्टाच्या निर्देशानुसार ) (वार्ड क्र २४) |

| अ.क्र | नो हॉकर्स झोन ठिकाणे |
|---|---|
| ०१ | काळेवाडी फाटा ते डांगे चौक संपुर्ण बी.आर.टी रोड (२४ मीटर रस्ता असले कारणामुळे ) |
| ०२ | काळेवाडी फाटा ते तापकीर चौक संपुर्ण बी.आर.टी रोड (२४ मीटर रस्ता असले कारणामुळे ) |
| ०३ | तापकीर चौक ते डी मार्ट चौक संपुर्ण बी.आर.टी रोड. (२४ मीटर रस्ता असले कारणामुळे ) |
| ०४ | डांगे चौक ते बिर्ला हॉस्पिटल चौक संपुर्ण रोड (दवाखाना आणि २४ मीटर रोड असले कारणामुळे) |
| ०५ | डांगे चौक येथील बाळकृष्ण मंगल कार्यालयाकडुन थेरगाव गावठाणाकडे येणारा रस्ता कॉर्नर.(दवाखाना आणि २४ मीटर रोड असले कारणामुळे) |
| ०६ | खिंवसरा मनपा शाळा ते वाकड रस्ता.(कोर्टाच्या निर्देशानुसार ) |
| ०७ | साई चौक पिंपरी ते जायका चहा चौक पिंपरी (जास्त रहदारीचा रस्ता असल्यामुळे ) |
| ०८ | रिव्हर रोड पिंपरी कडे येणारा रस्ता. ( जास्त रहदारीचा रस्ता असल्यामुळे ) |
| ०९ | कराची चौक ते जिजामाता चौक ते जयहिंद शाळा रोड ते जमतानी चौक पिपरी रस्ता. (कोर्टाच्या निर्देशानुसार ) |
| १० | अशोक थिएटर चौक पिंपरी .( जास्त रहदारीचा रस्ता असल्यामुळे ) |
| ११ | नवमहाराष्ट्र शाळेसमोरील रस्ता पिंपरी . (कोर्टाच्या निर्देशानुसार ) |

तरी सदरचे विषयास मान्यता देणेत येत आहे.

**टिप – (मा.अध्यक्ष यांचे आदेशानुसार सर्व शाखाधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधित उपरोक्त विषयांची सविस्तर माहिती/टिपण तयार करुन मासिक सभेचे वेळी उपस्थित रहावे.)**

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ग प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रिय कार्यालय, थेरगाव ३३
क्र.गक्षेका/कावि/४/ ९२ /२०१९
दिनांक - २/१/२०१९